# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक

# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक


| | |
|---|---|
| १.१ | संशोधनाची पार्श्वभूमी |
| १.२ | समस्या विधान |
| १.३ | संशोधनाचे महत्त्व व गरज |
| १.३.१ | संशोधनाचे महत्त्व |
| १.३.२ | संशोधनाची गरज |
| १.४ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा |
| १.४.१ | संशोधनाची व्याप्ती |
| १.४.२ | संशोधनाची मर्यादा |
| १.५ | संशोधनाची उद्दिष्टे |
| १.६ | संशोधनाची गृहीतके |
| १.७ | प्रकरणीकरण |

संदर्भ

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## १.१ संशोधनाची पार्श्वभूमी

आज आपण २१ व्या शतकात वावरत आहोत तरी सुद्धा प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झालेले नाही. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण याचा अर्थ सक्तीच्या वयोगटात येणाऱ्या सर्व मुलांसाठी व सर्वांना शिक्षण घेण्याची संधी लाभणे होय . म्हणजेच ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुले व मुली शाळेत आली पाहिजेत , टिकली पाहिजेत म्हणजेच स्थगिती व गळती थांबली पाहिजे. तसेच त्यांनां दर्जेदार शिक्षण लाभले पाहिजे.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यांसाठी विद्यार्थ्यांच्या मनावरील तसेच पाठीवरील शिक्षणाचे ओझे कमी केले पाहिजे तसेच कृती , क्रीडा , कला , जिज्ञासा यांचा उपयोग करून शिक्षण आनंदीदायी केले पाहिजे .

प्रचलित शिक्षणपध्दतीमध्ये शिक्षणाची उद्दिष्टे ठरलेली आहेत तरी सुद्धा इयत्तावार शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी निश्चित कोणत्या क्षमता प्राप्त करावयाच्या आहेत हे स्पष्ट होत नाही. विद्यार्थ्यांच्या आकलनापेक्षा स्मरणाला आधिक महत्त्व दिले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांचे खऱ्या अर्थाने शिक्षण होत नाही . विद्यार्थी जेव्हा पुढील इयत्तेमध्ये प्रवेश घेतात तेव्हा त्यांचे मागील इयत्तेचे ज्ञान विसरलेले दिसून आले कारण त्यांनी मिळविलेले ज्ञान परीक्षेपुरते स्मरणात ठेवलेले असते. खऱ्याअर्थाने विद्यार्थी विकास म्हणजे त्यांच्यामधील सुप्त गुण व शक्तींचे दृश्य व मूर्त स्वरूप होय . त्यालाच आपण क्षमता असे म्हणतो आणि ज्या शिक्षणाचा पाया क्षमता आहे अशा शिक्षणास क्षमताधिष्ठित शिक्षण असे म्हणतात. क्षमताधिष्ठित शिक्षण जून १९९७ पासून टप्प्या -टप्प्याने अंमलात येत आहे. निम्न प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना क्षमता प्राप्त करून देणे हे साध्य असून संबंधित घटक हे साधन आहे.

निम्न प्राथमिक स्तरावरील क्षमताधिष्ठित शिक्षण देत असताना व्यवस्थापनात कोणकोणत्या समस्या येतात याचा विचार करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड संशोधकास संशोधनासाठी कराविशी वाटली. त्या समस्या पुढील प्रमाणे संशोधकास जाणवितात.

मागील तासाच्या वेळी सर्वच विद्यार्थ्यांच्या सर्वांनी प्राप्त करावयाच्या अध्ययन क्षमता विकसित झालेल्या नसतात त्यामुळे पुढील तासाच्या वेळी अपेक्षित क्षमता विकसित होऊ

शकत नाहीत. काही विद्यार्थ्यांची अध्यनाची गती बरीच कमी असते त्यामुळे क्षमता विकासामध्ये समस्या उद्‌भवतात. वर्ग खोली अपुरी असल्यामुळे बैठक व्यवस्था सदोष असते म्हणून सर्व विद्यार्थी अध्यापनाकडे अवधान देऊ शकत नाहीत किंवा त्यांचे अवधान दीर्घकाळ टिकू शकत नाही. विद्यार्थीची संख्या जास्त असल्यामुळे वैयक्तिक मार्गदर्शन न मिळाल्यामुळे क्षमता विकास घडून येऊ शकत नाही. विद्यार्थी अनुपस्थित राहिल्यास तो विद्यार्थी क्षमता विकसित करू शकत नाही. काही विद्यार्थांना वेळ अपुरा पडतो असे विद्यार्थी दुसऱ्याचे स्वाध्याय पाहून स्वत:चे स्वाध्याय पूर्ण करतात त्यामुळे असे विद्यार्थी क्षमता विकासात मागे पडतात. शिक्षकांना रेकॉर्ड (नोंदी) तयार करण्यासाठी बराच अवधी लागतो त्यामुळे विद्यार्थांच्या क्षमता विकासाकडे दुर्लक्ष होते.

## १.२ समस्या विधान

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन खालील प्रमाणे केले आहे '' निम्न प्राथमिक स्तरावरील क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास ''

संशोधन हे एक शास्त्रीय कार्य आहे. कोणत्याही विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करतांना विशिष्ट संज्ञा विशिष्ट अर्थानेच वापराव्या लागतात. म्हणून संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधनाच्या वरील समस्या विधानात वापरलेल्या महत्त्वाच्या संज्ञांच्या क्रियात्मक व्याख्या पुढील प्रमाणे केल्या आहेत.

### निम्न प्राथमिक स्तर :

१०+२+३ या शैक्षणिक आकृतीबंधातील १० चे विभाजन १ ली ते ४ थी - निम्न प्राथमिक , ५ वी ते ७ वी - उच्च प्राथमिक आणि ८ वी ते १० वी - माध्यमिक स्तर असे करण्यात आले आहे याचा अर्थ असा की १ ली ते ४ थी या स्तरास 'निम्न प्राथमिक स्तर ' असे म्हणतात.

थोडक्यात संशोधकाने इयत्ता १ ली ते ४ थी या वर्गांचा विचार प्रस्तुत संशोधनात केला आहे.

क्षमताधिष्ठित शिक्षण :

खऱ्या अर्थाने विद्यार्थी विकास म्हणजे त्यांच्या मधील सुप्त गुण, शक्तींचे दृश्य व मूर्त स्वरूप होय. त्यालाच 'क्षमता' असे म्हणतात . आणि ज्या शिक्षणाचा पाया क्षमता आहे अशा शिक्षणास 'क्षमताधिष्ठित शिक्षण' असे म्हणतात.

व्यवस्थापन :

ज्या प्रक्रियेत पूर्वनिश्चित उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी निर्णय घेणे , मानवी कृतीवर नियंत्रण ठेवणे आणि कार्यवाहीकडे लक्ष देणे या बाबींचा समावेश होतो त्या प्रक्रियेस 'व्यवस्थापन' म्हणतात.

चिकित्सक अभ्यास :

संबंधित विषयाचे स्वरूप समजावून घेणे, वेगवेगळ्या संशोधन साधनांच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथक्करण,विशदीकरण करणे, निष्कर्ष काढणे,क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या व्यवस्थापनात सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शक सूचनांचा अविष्कार करणे म्हणजे चिकित्सक अभ्यास होय.

## १.३ संशोधनाचे महत्त्व व गरज :

### १.३.१ संशोधनाचे महत्त्व :

शिक्षकवर्गाला आपले ज्ञान कालानुरूप ठेवण्यासाठी विकास सेवा कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे आहे. शिक्षण ही एक सतत चालणारी प्रक्रिया असून तिच्यात पदोपदी सुधारणा घडून येत आहेत. सेवापूर्व प्रशिक्षणाने शिक्षकाची त्याच्या व्यवसायाला आवश्यक अशी तयारी होत असावी. तरी काही वर्षानंतर शिक्षणक्षेत्रातील झालेल्या प्रगती व सुधारणासंबंधी दिशा निर्देशनाकरिता सेवांतर्गत उजळणी-प्रशिक्षणाच्या कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक आहे. संबंधित

संशोधनाने अशा प्रकारचे उपयुक्त कार्यक्रम निश्चित करून शिक्षकांच्या कार्यक्षमतेत वाढ व आधुनिकता आणणे शक्य होणार आहे .

सद्यस्थितीत अनेक नवीन समस्या व प्रश्न शिक्षणतज्ज्ञ व प्रशासक यांच्यासमोर उभे राहिले आहेत. या समस्यांचे अभ्यासपूर्ण निराकरण करण्याचे उपाय शोधण्याकरिता संशोधन हेच एकमेव उपयुक्त साधन आहे. या संशोधनाने शिक्षणतज्ज्ञ व प्रशासक यांना क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या व्यवस्थापनातील समस्या समजतील, शिफारशींचा उपयोग करून समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होतील.[१]

शिक्षण ही एक कला आहे हे मान्य करूनही त्याच्या शास्त्रीय बाजूकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शिक्षणाचा केंद्रबिंदू विद्यार्थी, त्यांचा मानसशास्त्रीय अभ्यास, प्रयोग व संशोधनाद्वारे शिक्षणाला आधारभूत अशी अनेक तत्त्वे, नियम यांचा शोध लावला गेला आहे. बालकांचा बौद्धिक विकास, अवधान व ग्रहण यांचा संबंध, अध्ययन प्रक्रिया व परिणामकारक ग्रहणप्रक्रियेचे वा अध्ययनाचे नियम, अभिरूचीचे महत्त्व, स्मरणाबद्दलची आधारतत्त्वे इत्यादीबद्दलचे ज्ञान हे संशोधनानेच प्राप्त झाले आहे. त्यामुळेच शिक्षणाला शास्त्रीय बैठक प्राप्त झाली आहे. तसेच निरनिराळ्या पाठ्यविषयाबद्दलच्या ज्ञानात सतत भर पडून अभ्यासक्रम व अध्यापनपध्दती यात त्यानुसार फेरबदल घडून आले आहेत. ज्ञानाच्या कक्षा संशोधनामुळे विस्तृत होत असतात व या नव्या ज्ञानाचा उपयोग केला नाही तर शिक्षणात गतिरोध निर्माण होऊन प्रगती व सुधारणेला वावच राहणार नाही. संबंधित संशोधनामुळे विद्यार्थी सर्वांना प्राप्त करावयाच्या विहित अध्ययनक्षमता विकसित करणार आहेत.

शिक्षण हे एक सामाजिक शास्त्र असल्यामुळे समाजाच्या बदलत्या अपेक्षांनुसार सामाजिक विकासाबरोबरच शिक्षणातील उद्दिष्टे, पद्धती, साधने व व्यवस्था यामध्ये अनुरूप बदल करणे क्रमप्राप्त ठरते हा बदल संबंधित संशोधनाने शक्य होणार आहे.

शिक्षण क्षेत्रात धोरण ठरविणाऱ्यांना व शाळा शिक्षकांना संशोधन वृत्तीची फार गरज आहे. अनेक शैक्षणिक बाबींबद्दल निर्णय घेत असतांना कोणाचे मत किंवा हितसंबंध न पाहता संशोधनावर आधारित निर्णय घेऊन कार्य करणे उचित ठरते. तर्कसंगत, वैज्ञानिक दृष्टिकोन सोडून इतर कारणांमुळे घेतलेले निर्णय कसे चुकीचे असतात याची अनेक उदाहरणे आपल्याला पाहावयास मिळतात. योग्य निर्णय घेण्याची क्षमता संबंधित संशोधनामुळे अधिकाऱ्यांना,शिक्षकांना, मुख्याध्यापकांना प्राप्त होणार आहे.

शैक्षणिक क्षेत्रात नवीन बाबींचे संशोधन होणे गरजेचे आहे. अशा नवीन बाबींपैकी एक बाब म्हणजे 'क्षमताधिष्ठित शिक्षण' होय, म्हणून संशोधकाने ह्या संबंधित संशोधन करण्याचे ठरविलेले आहे.

### १.३.२ संशोधनाची गरज

शाळेत जाण्यायोग्य व या गटातील सर्व मुले, मुली यांची गळती व स्थगिती थांबली पाहिजे. परंतु ती शाळेत टिकून राहण्याचे आणि शिकण्याचे प्रमाण अपेक्षाहून कमी राहिले. मुले चार , पाच वर्षे सतत शाळेत जाऊनही त्यांना साधे लिहिता वाचता येत नाही अशा प्रतिक्रिया समाजाकडून येऊ लागल्या.

केवळ पाठ्यपुस्तक संपविण्याच्या हेतूने शिकविणे ह्या दृष्टिकोनामुळे शिक्षकांचे विषयांच्या उद्दिष्टांकडे पुरेसे लक्ष राहिले नाही. मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग मुले व्यवहारात करू शकत नाहीत अशी समस्या निर्माण झाली या पार्श्वभूमीवर प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये इयत्तेनुसार शिक्षण घेतल्यानंतर वर्षअखेरीस टिकाऊ आणि व्यवहारात उपयोगी पडू शकेल असे ज्ञान त्याला मिळालेच पाहिजे असा विचार पुढे आला त्यातूनच क्षमताधिष्ठित शिक्षणाची संकल्पना पुढे आली.[2]

निम्न प्राथमिक स्तर हा स्तर शिक्षणाचा पाया आहे. यामध्ये काही दोष असल्यास त्या दोषामुळे विद्यार्थ्यांच्या भावी जीवनावर विपरीत परिणाम होत असतो म्हणून क्षमताधिष्ठित शिक्षणाची अतिशय गरज आहे.

क्षमताधिष्ठित शिक्षणाची गरज जाणून घेतल्यांनतर हे शिक्षण निम्न प्राथमिक स्तरावर राबविताना त्याचे व्यवस्थापन कशाप्रकारे केले जाते, त्यामध्ये कोणते दोष आहेत, ते दोष दूर होण्यासाठी कोणत्या समस्या उद्भवतात, त्या कशाप्रकारे दूर केल्या पाहिजेत याचा विचार संशोधक करणार आहे.

## १.४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

### १.४.१ संशोधनाची व्याप्ती :-

संशोधकाने महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील प्राथमिक शाळांचा विचार केलेला आहे. या प्राथमिक शाळांतील निम्न प्राथमिक स्तरांचा विचार केलेला आहे.

### १.४.२ संशोधनाच्या मर्यादा :-

१. प्रस्तुत संशोधनाचा महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील प्राथमिकशाळांतील निम्न प्राथमिक स्तराचा ( इयत्ता १ ली ते ४ थी ) विचार केलेला आहे .

२. प्रस्तुत संशोधनात क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या व्यवथापनाचाच विचार केलेला आहे .

३. ज्या शाळांमध्ये मुख्याध्यापक आहेत अशा शाळांचा विचार करण्यात आलेला आहे .

४. प्रस्तुत संशोधन १९९९ - २००१ या वर्षासाठी मर्यादित आहे .

५. प्रस्तुत संशोधन हे मराठी , गणित आणि समान्यविज्ञान या विषयापुरते मर्यादित आहे .

## १.५ संशोधनाची उद्दिष्टे :-

१. निम्न प्राथमिक स्तरासाठी असणाऱ्या क्षमताधिष्ठित शिक्षणाचे स्वरूप समजावून घेणे .
२. क्षमताधिष्ठित शिक्षणाची उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य होतात याचा चिकित्सक अभ्यास करणे .
३. निम्न प्राथमिक स्तरावर क्षमताधिष्ठित शिक्षणाचे व्यवस्थापन करताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे .
४. क्षमताधिष्ठित शिक्षणाचे व्यवस्थापन करताना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी शिफारशी करणे .

## १.६ संशोधनाची गृहीतके :-

संशोधन करित असताना संशोधक काही गृहीतके मांडित असतो. गृहीतके मांडल्यामुळे संशोधकास दिशा , नियंत्रण व नेमकेपणा प्राप्त होतो .

प्रस्तुत समस्येसाठी पुढील गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत.

१. शिक्षण व क्षमता यांचा अन्योन्य संबंध आहे.
२. क्षमताधिष्ठित शिक्षणासाठी व्यवस्थापन आवश्यक आहे .
३. प्रस्तुत संशोधन हे नैसर्गिक शास्त्रातील संशोधनाप्रमाणे नेमके नाही.
४. प्रस्तुत संशोधन निम्न प्राथमिक स्तरावर अधिक सुधारणा करण्यासाठी आहे .

५. प्रस्तुत संशोधनात व्यवस्थानाचे कार्य व त्याच्या पाठीमागील कारणे हे परस्परावलंबी आहेत असे गृहीत धरलेले आहे .

## १.७ प्रकरणीकरण / प्रकरणांचे नियोजन :-

प्रस्तुत संशोधनात वापरलेल्या संशोधन पद्धतीद्वारे व संशोधन साधनाद्वारे संकलित झालेल्या माहितीचे वर्गीकरण, पृथक्करण आणि चिकित्सक परीक्षण केलेले आहे . संख्याशास्त्रीय प्रक्रिया करून निष्कर्ष काढलेले आहेत. व त्यावरून क्षमताधिष्ठित शिक्षणाच्या व्यवस्थापनासाठी परिणामकारक शिफारशी सुचविलेल्या आहेत या सर्व बाबींचे पुढील प्रकरणांमध्ये नियोजन केलेले आहे .

### प्रकरण १ ले :- प्रास्ताविक

प्रकरणांच्या नियोजनातील पहिले प्रकरण प्रास्ताविक असून या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाची पार्श्वभूमी, व्याप्ती व मर्यादा, त्यांची गरज, त्यांची उद्दिष्टे, गृहीतके यांचा समावेश केलेला आहे .

### प्रकरण २ रे :- संदर्भ साहित्याचे समालोचन

या प्रकरणात समस्येशी संबंधित साधन सामग्रीचा आढावा घेतलेला आहे . त्यामध्ये उद्दिष्टे, संशोधन साधने, कार्यपद्धती व निष्कर्ष यांचा विचार केलेला आहे .

### प्रकरण ३ रे :- निम्न प्राथमिक स्तरावरील क्षमताधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व

या प्रकरणात क्षमताधिष्ठित शिक्षणाचा तात्त्विक अर्थ, स्वरूप, महत्त्व व कार्यवाही यांचा विचार केलेला आहे .

## प्रकरण ४ थे :- संशोधन कार्यपद्धती

या प्रकरणात संशोधन पद्धती , संशोधन साधने, तंत्रे कोणकोणती वापरली आहेत हे सांगितलेले आहे .

## प्रकरण ५ वे :- संकलित माहितीचे पृथक्करण व अर्थनिर्वचन

या प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती , शाळांना प्रत्यक्ष भेटी, पाहणी, चर्चा या साधनांद्वारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व पृथक्करण केलेले आहे .या शिवाय मुख्याध्यापक, शिक्षक, गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या मुलाखती व चर्चेतून मिळालेल्या माहितीचा अन्वयार्थ लावला आहे .

## प्रकरण ६ वे :- निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणा मध्ये माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात निष्कर्ष काढले व त्या समस्यांना अनुसरून शिफारशी सुचविण्यात आलेल्या आहेत .

प्रस्तुत संशोधनाशी संबंधित नसणाऱ्या परंतु पुढील संशोधनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्या सुचविण्यात आलेल्या आहेत .

## संदर्भ


१. मुळे रा . श . उमाठे वि . तु . - शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, आवृती -३ नागपूर,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ १९९८.

२. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे. - क्षमताधिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-१९९५

# प्रकरण दुसरे

## संदर्भ साहित्याचे समालोचन